अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**कार्यालय - कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता : - मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जिल्हा - अहिल्यानगर. पिन - ४१३ ७२२.

जा.क्र.प्रशासन/शाखा-ब/प्रकल्पग्रस्त/जाहिरात/मुदतवाढ/गट (क)(ड)/२५८७/२०२५ दिनांक :०१/०७/ २०२५

**वाचा** :- १) शासन निर्णय क्रमांक : कृषिवि-३७२३/प्र.क्र.१६९/६-अे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४

२) जा.क्र.प्रशासन-ब/प्रकल्पग्रस्त/पदभरती/जाहिरात/गट(क)(ड)/४४१५/२०२४, दि. ३१.१२.२०२४

३) मा.मंत्री, कृषि यांचे मंत्रालयीन दालनातील दि. ३० जुन, २०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश

## जाहीर सुचना (मुदतवाढ)

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर, कार्यक्षेत्रातील (अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) ज्या प्रकल्पग्रस्तांच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या प्रकल्पाकरिता प्रत्यक्षात जमिनी संपादित झालेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांना सरळसेवेने रिक्त पदांवर भरती करण्याकरिता संदर्भ क्रमांक ०१ वरील शासन निर्णयान्वये व संदर्भ क्रमांक ०२ नुसार दिनांक ३१.१२.२०२४ रोजी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तासाठी पदभरती करणेकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरील जाहिराती अन्वये विविध पदांकरिता अर्ज करणेसाठी दिनांक ३०.०१.२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तद्नंतर विविध प्रकल्पग्रस्त संघटना यांनी या कार्यालयास निवेदन सादर करुन अर्ज सादर करणेबाबत मुदतवाढ देणेबाबत विनंती केल्याने अर्ज सादर करणेबाबत प्रथमत: दिनांक २८.०२.२०२५ व तद्नंतर २४.०३.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास (दि.२४.०३.२०२५) किंवा त्यापूर्वी काही विद्यापीठ प्रकल्पग्रस्त यांना मुदतीत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र न मिळाल्याने अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयास प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज सादर केलेबाबतची पोहोच पावती त्यांचे अर्जांसोबत सादर केली आहे. अशा उमेदवारांना दिनांक ३०.०६.२०२५ पर्यंत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देण्यात आली होती.

आता, संदर्भ क्रमांक ०३ नुसार निर्देशित केल्याप्रमाणे **विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना** गट - क व गट -ड या दोन्ही गटांतील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात येत असुन त्यासाठी **दिनांक ०७.०७.२०२५ पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.** तसेच, दिनांक ०७.०७.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या कोणताही अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे, टपालाने विलंब झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. असे प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील, याची संबंधित विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमदेवारांनी नोंद घ्यावी.

02.07.2025

**(राजेंद्रकुमार पाटील)**
**कुलसचिव**